महापालिकेच्या विशेष पथकाने ठोकले लक्ष्मण महाराज प्रशालेस सील

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या विशेष पथकाने शनिवारी सुट्टीच्या दिवशीही मिळकत कर थकबाकी वसुली मोहीम राबविली. बाळीवेस येथील एका लक्ष्मण महाराज प्रशालेच्या मुख्याध्यापक कार्यालय व स्टाफ रूमला सील ठोकले. शनिवारी विशेष पथक आणि दैनंदिन अशी एकूण ३० लाख १३ हजार १८४ रुपयांची थकीत मिळकत कर वसुली झाली आहे, अशी माहिती महापालिका कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी दिली.

महापालिका कर संकलन विभागाच्या विशेष पथकाकडून शनिवारी तिसऱ्या दिवशीही बड्या मिळकत कर थकबाकीदारावर सील ठोक कारवाई करण्यात आली. शनिवारी बाळीवेस येथील लक्ष्मण महाराज प्रशालेच्या वडार मंदिर, तुळजाराम शेट्टी, मुख्याध्यापकाचे कार्यालय व स्टाफरूम सील करण्यात आले आहे. त्यांच्याकडे ११ लाख ३६ हजार ३२६ रुपये मिळकत कराची थकबाकी आहे.

यापूर्वी नोटीसा बजावण्यात आलेल्या थकबाकीदारांकडून शनिवारी विशेष पथकाने एकूण १५ लाख ७६ हजार ९४५ रुपये करवसुली केली आहे. तर दिवसभरात दैनंदिन मिळकतकर वसुली १४ लाख ३६ हजार २३९ रुपये झाली

सुट्टीच्या दिवशीही कर संकलन केंद्र सुरूच राहणार

महापालिकेच्या मिळकत कर शास्तीमध्ये ८० टक्के सूट अभय योजनेची मुदत दि.१५ डिसेंबर २०२२ पर्यंत आहे. तेव्हा नागरिकांच्या सोयीसाठी रविवारी सुट्टी दिवशीही महापालिकेचे कर संकलन केंद्र मिळकत कर भरण्यासाठी सुरू ठेवण्यात येणार असल्याचे कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी सांगितले.

सुट्टीच्या दिवशीही ३० लाख रुपये थकीत मिळकत करवसुली

तीन दिवसात ३.१७ कोटी रुपये मिळकत कर वसूल

महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या विशेष पथकाकडून गेल्या तीन दिवसापासून बड्या थकबाकीदारांच्या मिळकतींना सील ठोकण्याची कारवाई हाती घेण्यात आली आहे. दरम्यान, या तीन दिवसात विशेष पथकाने १ कोटी ६३ लाख ८९ हजार १८७ रुपये मिळकत करवसुली केली आहे तर महापालिकेच्या दैनंदिन मिळकत करवसुली पोटी १ कोटी ५३ लाख ३६ हजार २३९ रुपये एकूण करभरणा झाला आहे. विशेष पथक आणि दैनंदिन असे दोन्ही मिळून या तीन दिवसात मिळकत कर वसुलीपोटी एकूण ३ कोटी १७ लाख २५ हजार ४२६ रुपये महापालिका तिजोरीत जमा झाले आहेत.

महावितरणने पकडल्या कोट्यवधी रुपयांच्या वीजचोऱ्या

- नोव्हेंबरमध्ये १७५ वीजचोऱ्या आल्या उघडकीस
- सोलापुरातील नातेपुते वीज चोरींचा समावेश

सुराज्य/सोलापूर

नोव्हेंबर मध्ये महावितरणच्या भरारी पथकाने पुणे प्रादेशिक विभागात ३ कोटी ५६ लाख ६० हजार रुपयांची १७५ वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आणली आहेत. थडक कारवाई मुळे वीज चोरांचे धाबे दणाणले आहे. उघडकीस आणलेल्या वीज चोरीमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचा समावेश आहे.

नोव्हेंबरमध्ये पुणे ग्रामीण भागातील उरुळीकांचन परिसरात रात्रीच्या वेळी भरारी पथकाने धाड टाकून पेट्रोल पंपाची वीजचोरी उघडकीस आणलेली. सदर व्यावसायिक ग्राहकाने मीटरला जंपर टाकून बायपास करून वीजचोरी करण्याची तरतूद केलेली होती. ग्राहकास ९० हजार १७९ युनिटचे १९ लाख ४२ हजार १८२ रूपयांचे वीजचोरीचे बील देण्यात आले आहे.

दुसऱ्या प्रकरणात पुणे शहर भागातील ८० केडब्ल्यू जोडभार असलेल्या व्यावसायिक ग्राहकाची वीजचोरी पकडण्यात आली. सदर व्यावसायिक ग्राहकाने मीटरच्या आधी एल. टी. केबलला टॅप करून मीटर बायपास करून वीजचोरी केलेली होती. सदर ग्राहकांनी ८० हजार ४३८ युनिट्सची चोरी केल्याचे तपासात उघड झाले असून त्यांना २८ लाख १४ हजार रूपयांचे वीजचोरीचे बील देण्यात आले आहे.

तिसऱ्या प्रकरणात कोल्हापूरमधील इचलकरंजी भागातील ९१ एच. पी. जोडभार असलेल्या औद्योगिक ग्राहकाची वीजचोरी उघडकीस आलेली आहे. सदर औद्योगिक ग्राहकाने मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी केल्याचे तपासात आढळून आले व ९० हजार २०८ युनिटस् चोरी केल्यामुळे त्यांना १५ लाख २१ हजार ७१० रूपयांचे वीजचोरीचे बील देण्यात आले आहे.

सोलापूरमधील नातेपुते भागातील ६० एच. पी. जोडभार असलेल्या औद्योगिक ग्राहकाची वीजचोरी उघडकीस आलेली आहे.

सदर औद्योगिक ग्राहकाने दुसऱ्या डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मरवरून एल. टी. केबल टाकुन मीटर बायपास करून वीजचोरी केल्यामुळे त्यांना ६९ हजार ५५५ युनिट्सची वीज चोरी केल्यामुळे ११ लाख ५५ हजार ३०० रूपयांचे वीजचोरीचे बील देण्यात आले आहे.

आगामी काळात वीजचोरांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात वीज चोरी शोध मोहीम राबविण्याचे निर्देश महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिले आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली सुरक्षा व अंमलबजावणी विभागाचे उपसंचालक सुमित कुमार हे पुणे प्रादेशिक विभागातील वीज चोरांवर कडक पाळत ठेवत आहेत.



काँग्रेसच्या सोलापूर शहरअध्यक्षपदी निवड झाल्यानंतर माजी नगरसेवक चेतन नरोटे यांनी 'सुराज्य' ला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत व्यवस्थापकीय संपादक रोनित टोळये यांनी केले. यावेळी विनोद भोसले, सुशील बंदपट्टे, अरुण साठे, बाबूराव म्हेत्रे, तिरुपती परकीपंडला, भीमाशंकर टेकाळे, लक्ष्मीकांत साका, शाहू सलगर, कपिल माशाळ आदि उपस्थित होते.

गुरुजींनो, झेडपीत यायचं आहे; येताना मुख्याध्यापकांचा पत्र आणाच

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद प्रशासनात गेल्या एक महिन्यापासून बदल करण्यात येत आहेत. जिल्हा परिषद शिक्षण विभागात येणाऱ्या शिक्षकांची संख्या सर्वाधिक दिसून येते. त्यामुळे जिल्हा परिषदेत विनाकारण येणाऱ्या शिक्षकांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न जि. प. प्रशासनाकडून करण्यात येत आहे. शिक्षकांना जर जिल्हा परिषदेत यायचं असेल तर त्यांनी मुख्याध्यापक यांच्या परवानगीचे पत्र सोबत आणावे तरच त्यांना प्रवेश मिळेल अशी भूमिका जि. प. सीईओ दिलीप स्वामी यांनी घेतली आहे.

अनेक शिक्षक हे पूर्वपरवानगी शिवाय अनधिकृतपणे जिल्हा कार्यालयात येत असतात. यापुढे मुख्याध्यापकांचे लेखी आदेश असल्याशिवाय वरिष्ठ कार्यालयात येऊ नये, असे लेखी आदेश शिक्षण विभागास देण्यात आले आहेत. शाळेत उशीरा येणाऱ्या व गैरहजर असणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्यात येणार आहे.

सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना सेवा हमी कायदा, माहिती अधिकार कायदा, कार्यालयीन कामकाज याबाबत लेखी आदेश देऊन विहित मुदतीतच सर्व कामकाज पूर्ण करण्याचे आदेशही जि. प. सीईओ यांच्याकडून देण्यात आले आहेत.

सीईओ दिलीप स्वामी यांचे आदेश

शिक्षक बदली प्रक्रियेचे कामकाज विहीत मुदतीत पूर्ण करावे, सर्व विभागाने कार्यालयात येणाऱ्यांसाठी रजिस्टर ठेवावे, किशोरी मेळावा, क्रीडा स्पर्धा, टॅलेंट हंट स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन यांचे नेहमीप्रमाणे नियोजन करावे. कर्मचारी व अधिकारी यांना ओळखपत्र परिधान करावे अशाही सूचना देण्यात आले आहेत.

शालेय पोषण आहार अंतर्गत १०० टक्के शाळांचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. सर्व गट शिक्षणाधिकारी यांनी याची माहिती संकलन करुन एका आठवड्यात वेबपोर्टलवर १० डिसेंबरपूर्वी भरावी. केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी यांनी दररोज शाळेला भेट दिल्याची माहिती दररोज संध्याकाळी चारपूर्वी माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

रिक्षा अपघातातील जखमी महिलेचा मृत्यू; मयताची संख्या ५ झाली

तिघा जखमींवर अद्यापही उपचार सुरू

सुराज्य/सोलापूर

दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या रिक्षाला ट्रकने जोरदार ठोकरल्याने जखमी झालेल्या एका महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी सकाळी मृत्यू झाला.त्यामुळे मयताची संख्या आता ५ झाली आहे

रुकसाना शब्बीर कोरबू (वय ४६रा. विनायक नगर,शेळगी) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे . दरम्यान रिक्षा अपघातात आज पर्यंत जखमी झालेल्यातील एकूण ५ जणांचा मृत्यू झाला असून आणखी तिघा जणांवर शासकीय रुग्णालयात अद्यापही उपचार सुरू आहेत .

मित्र नगर येथील कोरबू कुटुंबीय हे शुक्रवारी २ डिसेंबर रोजी दुपारी रिक्षातून शाहजहूरअली दर्गा येथे जात असतान मित्र नगर रोडवरील परमशेट्टी मिल परिसरात समोरून येणाऱ्या ट्रक (एमएच४३-बीपी ८७८८) ने सदर रिक्षाला धडक दिली होती. या धडकेत एकूण नऊ जण जखमी झाले होते. मिसबा शुकुर मुलाणी (वय १३ वर्ष) हिचा त्याच दिवशी मृत्यू झाला होता. त्यानंतर ३ डिसेंबर रोजी आलीम शकूर मुलानी(वय ७ वर्ष), अलनाज हुसेन कोरबु (वय ७ वर्ष) हिचा तर जन्नतबी शब्बीर कोरबू (वय २३ वर्ष) यांचा ९ डिसेंबर रोजी दुपारी उपचारादरम्यान मृत्यू झाला होता . त्यानंतर आज शनिवारी सकाळी रुकसाना कोरबू हो महिला उपचारादरम्यान मरण पावली. दरम्यान या अपघात प्रकरणी रिक्षा चालक रामराजे प्रकाश निंबाळकर (वय ४३ वर्ष, रा. लक्ष्मीनारायण नगर ,शेळगी) यावर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून महिला पोलीस फौजदार व्हट्टे या पुढील तपास करीत आहेत .

कै. चाकोते यांना विविध संस्था संघटनाकडून आदरांजली

सुराज्य/सोलापूर

सहकार, राजकारण, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले लोकनेते माजी आमदार कै. बाबूराव अण्णा चाकोते यांच्या १९ व्या स्मृती दिनानिमित्त सोलापूर शहर जिल्ह्यातील विविध संस्था संघटनांकडून आदरांजली अर्पण करण्यात आली.

नगरसेवक ते आमदार अशी राजकीय कारकीर्द यशस्वीपणे पार पाडणारे आणि सहकार क्षेत्राचा सर्वसामान्यांच्या आयुष्यात लाभ मिळवून देऊन सर्वसामान्यांचा आर्थिक स्तर उंचावणाऱ्या सहकार तपस्वी कै. बाबूराव अण्णा चाकोते यांची शनिवार दि. १० डिसेंबर रोजी १९ वी पुण्यतिथी होती त्या निमित्ताने तळेहिप्परगा येथे त्यांच्या शेतातील समाधिस्थळावर सकाळी रुद्रपूजा करण्यात आली.

यावेळी सिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, सिध्दाराम चाकोते, विश्वराज चाकोते, विश्वशंकर चाकोते यांच्यासह चाकोते परिवार उपस्थित होता. त्यानंतर सिध्देश्वर मार्केट कमिटीच्या आवारातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्केट कमिटीचे अध्यक्ष आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष श्रीशैल नरोळे, संचालक बसवराज इटकळे, केदारनाथ उंबरजे, शिवानंद पुजारी, प्रभुराज विभूते, रेवणसिध्द आवजे, आशिष दुलंगे, पशुपतीनाथ माशाळे, केदार बिराजदार, गजानन व्होनराव, सादीक सत्वम, नजाकत मंद्रुपकर, इआरटी, अखलाक मर्चंट, महालिंग परमशेट्टी स्वामी, महेश ठेसे यांच्यासह बाजारपेठेतील व्यापारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथील शरद सुत गिरणीच्या आवारातील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. नंतर जयभवानी तरुण मंडळ तुळजापूर वेस येथे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर तळेहिप्परगा येथे दिवसभर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील विविध संस्था संघटनांसाठी लोकनेते बाबूराव अण्णा चाकोते यांनी भरीव कामगिरी केली आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध मान्यवरांनी आदरांजली अर्पण केली.

डॉक्टर पत्नीच्या चारित्र्यावर संशय; पतीसह आठ जणांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर : डॉ.पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तुझ्या आईने व भावाने लग्नात व्यवस्थित मानपान केला नाही.तसेच तुझ्या आईकडून प्लॉट घेण्यासाठी दोन लाख रुपये घेऊन ये असे म्हणत शारीरिक व मानसिक त्रास देऊन सतत पैशाची मागणी करून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी आफरीन म.जुनेद अख्तर (वय-३०,रा.सृष्टी अपार्टमेंट वर्धा, सध्या-नरेंद्र नगर, सैफुल) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती महमद जुनेद अख्तर,सासू अलिफा अब्दुल रौफ,ननंद अंजुम,नणंदची मुलगी मिसबा इम्रान,नणंद राणी,राणी यांची मुलगी सिमी,दिर जावेद अब्दुल व पहिली पत्नी हुमेरा म.जुनेद अख्तर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

जिल्हा प्रकल्प अधिकाऱ्याच्या घरी चोरी

सुराज्य/सोलापूर : किचन रुमला कडी न लावता बंद केलेला दरवाजा ढकलून अज्ञात चोरट्याने प्रवेश करून घरातील दहा हजार रुपये किंमतीचा मोबाईल व नऊ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण एकोणीस हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.९ डिसेंबर च्या मध्यरात्री मुस्लिम पाच्छा पेठ,जिंदा मदारशा चौक येथे घडली.याप्रकरणी रिजवान कलंदर मुल्ला (वय-३४,रा.मुस्लिम पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केला आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल धुमाळ हे करीत आहेत.

महिला व बालकल्याण समितीच्या प्रशिक्षणासाठी २२५८ लाभार्थ्यांची निवड

- पात्र लाभार्थ्यांना पाठविले एसएमएस
- पंधरा दिवसात होणार प्रशिक्षण सुरू

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्यावतीने शहरातील महिला व मुलींसाठी विविध आठ प्रकारच्या प्रशिक्षणासाठी अर्ज तपासणीअंती २ हजार २५८ लाभार्थी पात्र ठरले आहेत. एकूण २ हजार ८५७ प्राप्त अर्ज पैकी ५९९ अर्ज अपात्र ठरले आहेत. निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना एसएमएसद्वारे कळविण्यात आले आहे.

येत्या पंधरा दिवसात हे प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहेत. शक्यतो लाभार्थ्यांच्या राहत्या घराशेजारील प्रशिक्षण सेंटर देण्यात येणार असल्याची माहिती महापालिका महिला व बालकल्याण समितीचे अधिकारी विठ्ठल कस्तुरे यांनी दिली.

महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ आणि नियंत्रण अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका महिला व बालकल्याण समितीच्यावतीने विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शहरातील महिला व मुलींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा. त्या आत्मनिर्भर व्हाव्यात, या उद्देशातून कौशल्य आधारित हे प्रशिक्षण मोफत देण्यात येत आहे. त्यासाठी इच्छुक महिला व मुलींचे ऑनलाइन पद्धतीने २ हजार ८५७ अर्ज आले. त्या अर्जांची कागदपत्रे, पात्रता निकष, दुबार अर्ज यानुसार तपासणी करण्यात आली. प्राप्त अर्जापैकी २ हजार २५८ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली तर ५९९ अर्ज हे अपात्र ठरले आहेत. दरम्यान, निवड झालेल्या लाभार्थ्यांना एसएमएसद्वारे निवड निश्चित झाल्याचे कळविण्यात आले आहे. येत्या १५ दिवसात हे सर्व कोर्सेस सुरू होतील. लाभार्थ्यांच्या राहत्या घराशेजारील सेंटर देण्यात येणार आहे.

लाभार्थ्यांची संख्या अशी

एमएससीआयटी - ७६०, टॅली - ५८१, बँकिंग - २२५, ब्युटी पार्लर - ३५९, फॅशन डिझायनिंग - १२९, टेलरिंग - १७०, मार्शल आर्ट कराटे - १५, सोलर पॉवर सिस्टीम - १९ लाभार्थी पात्र ठरले आहेत. ३ महिन्याच्या कालावधीचे हे कोर्स आहेत. महापालिकेच्या संकेतस्थळावर पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर केली आहे, अशी माहिती महापालिका महिला व बालकल्याण समिती अधिकारी विठ्ठल कस्तुरे यांनी दिली.

रिक्षा वळवल्याच्या कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण

सुराज्य/सोलापूर : आमच्या दुकानासमोरून रिक्षा का वळवली या कारणावरून तरुणास लाथा बुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी रॉड हातावर मारून जखमी केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.८ डिसेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास जाधव पान शॉप भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी सचिन संजय सितासावंत (वय-२५,रा.भवानी पेठ) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून निशान जाधव,प्रशांत जाधव,रुक्मिणी जाधव, दिपाली जाधव (सर्व रा.भवानी पेठ,घोंगळे वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी यांचा भाऊ दादुशा सितासावंत हा त्याची रिक्षा वरील संशयित आरोपी यांच्या पान दुकानासमोरून वळवली असता वरील संशयित आरोपी यांनी आमच्या दुकानासमोरून रिक्षा का वळवली या कारणावरून फिर्यादी व त्यांच्या भावास शिविगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

मुळे हॉस्पिटल समोरून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर : मुळे हॉस्पिटल येथे रस्त्याच्या कडेला पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एम.एच.१३.सीवी.९३२७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना दि.६ डिसेंबर रोजी घडली.याप्रकारानी सुधीर परमेश्वर बनसोडे (वय-३०,रा.मातंग वस्ती भीमानगर,देगाव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.